"नॉर्थ कॅनरा जी. एस्. बी. वृत्तविलास"
दि नॉर्थ कॅनरा गौड सारस्वत ब्राह्मण संघाची त्रैमासिक

# मुखपत्रिका

कार्यालय फोन : २३८७७३०१, २३८८००७३
**WEB SITE** : **http://www.nkgsbsangh.org**
**E-MAIL** : **nkgsbs@gmail.com**
कार्यालयीन वेळ : दुपारी ३ ते ७ (शनिवारी ३ ते ५)

।। अति सर्वत्र वर्जयेत्।।

मूल्य रु. ५

क्रमांक २ वर्ष : ३८ जुलै-सप्टेंबर २०१६

**BOOK PACKET (PERIODICAL)**
Regd. with Registrar of Newspaper of India, Reg. No. RN37436/80

**TO,**

**From :** The NKGSB Sangh, Laxmi Sadan, 361, V.P. Road, Mumbai - 400 004.

## निमंत्रण

## ठाणे मंचतर्फे वर्धापनदिनानिमित्त
## सांस्कृतिक कार्यक्रम व हळदीकुंकू समारंभ

**श्रावण मासी हर्ष मानसी ..... अगदी खरं**
**श्रावण मास ..... कधी ऊन - कधी पाऊस**
**सणासुदीचे दिवस साजरे करण्याची हौस**
**चला तर जमूया आणि संपन्न करूया**
**मनोरंजनात्मक एक रंगारंग कार्यक्रम**
**सर्व बंधूभगिनींना अगदी अगत्याचे निमंत्रण**

**तारीख** : रविवार दिनांक २८ ऑगस्ट, संध्या ४.०० ते ८.००
**स्थळ** : कालिदास कॅफे, स्विमींग पूल, मुलुंड स्पोर्टस् कॉम्पलेक्स, पी. के. रोड, मुलुंड (पूर्व).

**मध्यंतराच्या दरम्यान श्रावणी हळदीकुंकूचा कार्यक्रम होईल.**

**टीप : सदर कार्यक्रम विषयानुरूप (Theme श्री कृष्ण) होणार आहे तरी इच्छुकांनी सहभागी होण्यासाठी १५ ऑगस्ट पर्यंत संपर्क साधावा. रात्रौ : ८ ते १०**

सुरेश पालेकर : ९९६९४५५३७०
मिथिला गायतोंडे : ९८९२९६११८८ मंजिरी कुलकर्णी : ९६६५०९८११७

## विवाहाचे सुवर्ण वर्ष गाठणाऱ्या जोडप्यांचा व ७५ वयोमर्यादा ओलांडणाऱ्या व्यक्तींचा संघातर्फे सत्कार

नेहमीच्या प्रथेनुसार यंदाही २७ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या ज्ञातीच्या स्नेहसंमेलनात २०१६ ह्या वर्षात विवाहाचे सुवर्ण वर्ष गाठणाऱ्या जोडप्यांना व ७५ वयोमर्यादा ओलांडणाऱ्या व्यक्तींना ज्ञातीतर्फे स्मृतिचिन्हे देऊन त्यांचा सत्कार करण्यात येईल. संबंधित व्यक्तींनी किंवा त्यांच्या आप्तेष्टांनी त्यांची संपूर्ण नावे, पत्ता व टेलिफोन नंबर ३० सप्टेंबर २०१६ पर्यंत संघाच्या पत्त्यावर पाठवून किंवा टेलिफोनवर कळवून आम्हांस उपकृत करावे.

**१ ऑक्टोबर नंतर अशी नावे आल्यास ऐनवेळी ही स्मृतिचिन्हे तयार करणे कठीण जाते याची कृपया दखल घ्यावी.**

## हळदीकुंकू समारंभ : भगिनींस निमंत्रण

नेहमीचा श्रावणातला हळदीकुंकू समारंभ यंदा जोगेश्वरी व मुलुंड येथे योजिला आहे. आपण हेच निमंत्रण समजून वेळात वेळ काढून आपल्या लेकीसुनांसह सोयीस्कर ठिकाणी अवश्य उपस्थित राहावे.

| जोगेश्वरी | मुलुंड |
|---|---|
| **तारीख** : शुक्रवार २६ ऑगस्ट | रविवार २८ ऑगस्ट |
| **स्थळ** : रामेश्वर मंदीर सरस्वती बाग, जोगेश्वरी (पू) | वार्षिक वर्धापनदिन समारंभ अंतर्गत विशेष तपशील पृ. २ वर दिल्याप्रमाणे |
| **वेळ** : संध्याकाळी ५ ते ७ | **ठाणे मंच कार्यकारिणी तर्फे** |
| **संघ कार्यकारिणी तर्फे** | सुधा दळवी सुरेखा पालेकर |
| जयश्री भेडसगांवकर, शांता पालेकर | |

# संपादकीय

### बँकांच्या घसरत्या व्याजदरामुळे संघाच्या उत्पन्नांत घट, ज्ञातिबांधवांना आवाहन

आपल्या संघातर्फे समाजसेवा, वृध्दसेवा, वैद्यकीय खर्च, विवाह खर्च इत्यादीसाठी ज्ञातींतील गरजूंना आर्थिक साहाय्य देण्यात येते. ही मदत चरितार्थासाठी ज्यांना विशेष उत्पन्न नाही अशा वयस्कर व्यक्तींना दिली जाते. ६० वर्षावरील व्यक्तींना समाजसेवाअंतर्गत व निराधार व्यक्तींना वृध्दसेवाअंतर्गत मासिक साहाय्य दिले जाते. सध्या समाजसेवे अंतर्गत ४५ व वृध्दसेवेअंतर्गत १८ लाभार्थी आहेत. नवीन अर्ज व वैद्यकीय साहाय्यासाठी विनंत्या येतच असतात. वैद्यकीय साहाय्या अंतर्गत नेहमीच्या आजारपणाच्या खर्चाशिवाय कॅन्सर, बायपास, डायालिसीस अशा दुर्धर व्याधीसाठी सुध्दा गरजूंना जास्तीतजास्त मदत पुरविण्यात येते. गेल्या आर्थिक वर्षांत वैद्यकीय साहाय्यासाठी सुमारे ८ लाख रुपये देण्यात आले.

सध्या बँकांच्या व्याजदरामध्ये सतत घसरण होत आहे. त्यांमुळे मुदतठेवीच्या व्याजावरून मिळणाऱ्या उत्पन्नांत घट होत आहे. वाढत्या महागाईमुळे मासिक साहाय्यात वाढही करणे जरुरीचे आहे. उत्पन्नात घट व वाढीव गरज यांची हातमिळविणी करण्यात कार्यकारिणीची फार ओढाताण होते.

अशा परिस्थितीत सर्व ज्ञातिबांधवांना कळकळीचे आवाहन की त्यांनी सढळ हातांनी संघाला देणग्या द्याव्या, जेणेकरुन संघाचे कार्य अबाधित राखणे सुलभ होईल.

१ जुलै २०१६

द. नी. नाडकर्णी

## एज्युकेशन सोसायटी : गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना बक्षिसे

दरवर्षी ज्ञातीच्या स्नेहसंमेलनांत ज्ञातीतील गुणवंत विद्यार्थ्यांना उत्तेजन देण्यासाठी बक्षिसे दिली जातात. त्यानुसार यंदाही २७ नोव्हेंबर २०१६ रोजी भरणाऱ्या स्नेहसंमेलनांत बक्षिसे दिली जातील. बक्षिसांची पात्रता पुढील प्रमाणे :

| परीक्षा | | किमान पात्रता |
|---|---|---|
| दहावी | | ८०% |
| बारावी – | विज्ञान (वैद्यकीय महाविद्यालयांत प्रवेश घेतला असेल तर अर्जात तसे नमूद करावे.) | ७५% |
| | वाणिज्य | ७०% |
| | कला | ६५% |
| पदवी व सरकारमान्य डिप्लोमा | | ६०% |
| एम.ए., एम.कॉम, एम.एस्सी. पीएच.डी, वैद्यकीय क्षेत्रातील पदवी एम.बी.ए., सी.ए., कॉस्ट अकौंटस, कंपनी सेक्रेटरी, पदव्युत्तर डिप्लोमा इत्यादी, | | उत्तीर्ण |
| परदेशांत घेतलेली पदवी | | ए ग्रेड |

तसेच किमान राज्य पातळीवरील क्रीडास्पर्धेत ज्यांना पदके मिळाली असतील किंवा जे स्कॉलरशिप परीक्षेत गुणवत्ता यादीत उत्तीर्ण झाले असतील तर संबंधितांनी त्याचाही तपशील पाठवावा. कार्यकारिणी अशाही अर्जांचा विचार करील.

**अर्ज स्वीकारण्याची शेवटची तारीख १ ऑक्टोबर २०१६**

विद्यार्थ्यांनी गुणवत्ता पत्रिकेची प्रत (झेरॉक्स), टेलीफोन नंबर, Email व संपूर्ण पत्ता. The NKGSB Ind & Education Society, Laxmi Sadan, 361, V.P. Road, Mumbai 400004. या पत्त्यावर पाठविण्याची कृपा करावी.

- ☐ विद्यार्थ्यांच्या वडिलांचे मूळ गांव उत्तर कानडांत असावे व ते स्मार्त कवळे मठानुयायी असावेत किंवा आई माहेरच्या तिथल्या असून सारस्वत पोटजातीतील गृहस्थाशी विवाहबद्ध असल्या पाहिजेत.
- ☐ बारावी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी एम.बी.बी.एस., जर्नेलिझम किंवा बी.कॉम. शाखेत प्रवेश घेतल्यास तसे नमूद करावे.
- ☐ ज्या डॉक्टर्सनी एम्.एस्. किंवा एम्.डी. साठी प्रवेश घेतला आहे, त्यांनाही काही पुरस्कृत बक्षिसे आहेत. संबंधितांनी याचा लाभ घेण्यासाठी अर्ज करावा.

# प्रकाशझोत

## 'मिशन पॉसिबल'

## कर्करोगतज्ज्ञ डॉ. रवीन्द्र कसबेकर यांचे आगळे पाळणाघर

कारवार येथील 'मुझुमदार अँड कसबेकर ब्रदर्स ' या जुन्या दुकानाचे तेव्हांचे एक भागीदार कै. यशवंत कसबेकर यांचे नातू डॉ. रवींन्द्र भालचंद्र कसबेकर हे पुण्यांतील एक प्रथित यश कर्करोग तज्ज्ञ. यांच्या एका आगळया छंदाची व संस्थेची र. लोकसत्ता यांनीसुध्दा दखल घेऊन त्याविषयी 'मिशन पॉसिबल' हा एक विस्तीर्ण लेख प्रसिध्द केला. ते एक पाळणाघर चालवतात. मात्र ते वेगळे आहे. ते आहे भटक्या, अनाथ कुत्र्यांचे पाळणाघर. येथे दाखल होणाऱ्या प्रत्येक कुत्र्याची उत्तम प्रकारे सरबराई केली जाते. प्रत्येकाची ममतेने निगा राखली जाते.

या पाळणाघरांत श्वानांची संख्या थक्क करणारी आहे. त्यांची संख्या आहे तब्बल ३००. त्यांची देखभाल करण्याचे काम अत्यंत निष्ठेने व आपुलकीने डॉक्टर अनेक वर्षे करीत आहेत. कोणीही अवाक व्हावे असेच हे कार्य.

दिवसभर खणाणणारा दूरध्वनी एकतर एखाद्या रुग्णातर्फे असतो किंवा एखादे कुत्र्याचे पिल्लू सांपडले आहे असा वर्दी देणारा असतो. दिवसभर पुण्यांतल्या निरनिराळया रुग्णांचे औषधोपचार व शस्त्रक्रिया झाल्यावर डॉक्टरांचा 'दिवस' खऱ्या अर्थाने रात्री सुरु होतो. पाळणाघरातले त्यांचे तीनशे श्वानमित्र त्यांची आतुरतेने वाट पाहतात. त्यांच्याशी खेळण्यांत, जेवण भरविण्यांत, औषधोपचार करण्यांत त्यांचे तीन तास कसे संपतात ते त्यांनाच कळत नाही.

तिथून निघाल्यावर त्यांच्या श्वानप्रेमाची दुसरी इनिंग्स सुरु होते. सुमारे २०० श्वानांचे भोजन असलेल्या तीन चार बादल्या आपल्या गाडींत घेऊन डॉक्टरांची नगरप्रदक्षिणा सुरु होते. पाच सहा ठराविक ठिकाणी खांबे घेत पहाटे अडीचच्या सुमारास घरी पोचतात. त्या त्या थांब्यावरील कुत्री त्यांच्या गाडीच्या दिशेने तोंड करुन थांबलेली असतात. गाडीचा आवाज येताच त्यांचे कान ताठ होतात. पोटोबा भरल्यावर शेपूट हलवून आपले समाधान व्यक्त करतात. हीच त्यांनी डॉक्टरांना दिलेली फी. वारा, पाऊस, थंडी, काळोख काहीही असले तरी गेल्या दहा वर्षात त्यांच्या या निरलस सेवेमध्ये खंड पडला नाही.

कुत्र्यांचा केवळ सांभाळ व उपचार करुनच डॉक्टर थांबत नाहीत, तर या कुत्र्यांना हक्काचे घर मिळावे यासाठीही ते सदैव प्रयत्नशील असतात. त्यांनी आतापर्यंत दीड हजार कुत्र्यांना दत्तक देऊन स्वत:चे घर मिळवून दिलेले आहे.

या कार्यांत साहाय्य करु इच्छिणाऱ्यांसाठी त्यांनी 'मिशन पॉसिबल' ही संस्था स्थापन केली

आहे. त्या संस्थेस देणगी देणाऱ्यांना आयकरांतून सवलतही मिळते. संस्थेचा व्याप दिवसेंदिवस वाढत चालला आहे. शहरांतील जागाही अपुरी पडत आहे. पुरंदर तालुक्यांतील एका पाच एकराच्या जागेंत हे पाळणाघर स्थलांतर करण्यांचा त्यांचा मानस आहे.

पदरचे मासिक दोन लाख रुपये खर्च करून तळमळीने व सद्भावनेने हे अनोखे कार्य करणाऱ्या डॉ. कसबेकर यांना सलाम!

**दोन हजारहून अधिक म्हणींचा 'कोंकणी म्हणीसागर'**

म्हणी (कोंकणीत ग्यादी) किंवा वाक्प्रचार हे कुठल्याही भाषेचे अलंकार. म्हणीशिवाय संभाषण बेचव (चेप्पी) वाटते. तॉयाला 'फॅाण्ण' घातल्यावरच ते खमंग होते तसेच म्हणीमुळे संभाषण अधिक चुरचुरीत होते. म्हणींचे महत्व, प्रकार, विविध भेद, त्यांतील जिवंत तत्वज्ञान, त्यांतील मिश्किल वा बोचरा विनोद हा एक संशोधनाचा विषयच होईल.

आपल्या कारवारकरांची बोली कोंकणी, वृत्ती कुचिंद्री, त्यांमुळे साध्या साध्या बोलण्यांत म्हणी पेरणे हा आपला स्थायीभाव.एखाद्या टिपिकल आवडाकाची जीभ म्हणजे एकतर खाजकुली करणारी किंवा घायाळ करणारी. पारंपरीक रीतीने आलेल्या बऱ्याचशा म्हणी दिवसेंदिवस काळाच्या उदरांत लुप्त होत आहेत. त्या जतन करणे आवश्यक होते. हे महान कार्य दादर येथील एक व्यासंगी श्री. मनोहर पै. धुंगट यांनी तडीस नेले. अनेक वर्षे अथक परिश्रम घेऊन त्यांनी सर्व प्रकारच्या सुमारे दोन हजाराहून अधिक म्हणींचा अर्थासह संग्रह केला. २००३ साली गोवा कोंकणी अकादमीने तो संग्रह 'कोंकणी म्हणीसागर' या ग्रंथरुपाने प्रकाशित केला. अलीकडेच त्याची सुधारित आवृत्ती प्रसिध्द झाली आहे. प्रत्येक कारवारकराने हा ग्रंथ संग्रही ठेवण्यासारखा आहे. त्यांतली पाने नुसतीच चाळली तरी जुन्या स्मृतींना उजाळा देण्याचा सुखद अनुभव मिळेल.

पृष्ठ संख्या - ३६०, मूल्य रु. २६०.

उपलब्ध - गोवा, कोंकणी अकादेमी २४३, पाटो, पणजी.

**शतकवीर श्रीमती इंदु मुझुमदार यांचा सत्कार**

मुखपत्रिकेच्या गेल्या अंकात संघाचे एक हितचिंतक श्रीमती इंदु मधुकर मुझुमदार यांनी १९ फेब्रुवारी शंभर वर्षे पूर्ण केली असा उल्लेख आला होता. त्याच दिवशी त्यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांचा सत्कार करणे कांही वैज्ञकीय कारणामुळे जमले नाही असेंही नमूद करण्यांत आले होते. त्यानंतर त्यांना थोडेसे बरे वाटू लागल्यावर त्यांच्या सवडीनुसार १३ मे रोजी संघाचे अध्यक्ष प्रेमानंद नाडकर्णी, उपाध्यक्ष मारुती दळवी, एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष देवीदास नाडकर्णी, उपाध्यक्ष विवेक कुलकर्णी व मुखपत्रिकेचे संपादक दत्तात्रय नाडकर्णी या पदाधिकाऱ्यांनी इंदुकाकींच्या दादर

येथील निवासस्थानी जाऊन शाल, पुष्पगुच्छ, व स्मरणभेट देऊन त्यांचा सत्कार केला व आशीर्वाद घेतला.

**कु रूपा पिकळे MSc (Zoology) विषयांत सर्वप्रथम. सात सुवर्णपदकांची मानकरी**

कै. कमलाकर व कृष्णाबाई पिकळे यांची नात व धारवाड येथील प्रकाश व पूर्णिमा पिकळे यांची कन्या कु. रूपा ही कर्नाटक विद्यापीठाची विद्यार्थिनी. गेल्या वर्षी MSc (Zoology) या विषयांत ती प्रथम वर्गात प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाली होती. गेल्या मे महिन्यांत झालेल्या दीक्षांत समारंभात त्या विषयासाठी ठेवलेली सात सुवर्णपदके तिला कुलपतींच्या हस्ते मिळाली. त्यापैकी एक पदक कर्नाटक विद्यापीठातील त्याच विषयाचे ज्येष्ठ प्राध्यापक कै. डॉ. व्ही. बी. नाडकर्णी यांनी ठेवलेले आहे. सध्या ती हावेरी येथील एका कॉलेजमध्ये अध्यापन करते.

**ऋत्विक कुलकर्णी याचे अभिरुप न्यायालय स्पर्धेतील स्पृहणीय यश**

सात बंगला (मुंबई) येथे राहणारे श्री. दिगंबर व सौ. कुंदा कुलकर्णी यांचा नातू चि. ऋत्विक मंगेश कुलकर्णी पुण्याच्या आय. एल. एस. विधी महाविद्यालयात शिकत आहे. जिंदल ग्लोबल लॉ स्कूल (सोनिपत) तर्फे २९ एप्रिल ते १ मे या दरम्यान आयोजित केलेल्या पहिल्या अभिरुप न्यायालय स्पर्धेमध्ये त्याने आपल्या महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व केले व विजयश्री मिळविली.

'कायदा आणि बौध्दिक संपदा यांचे वैश्विक संदर्भातील परस्परसंबंध' हा या स्पर्धेचा विषय होता. या स्पर्धेत दक्षिण आशियातील १४ नामवंत विधी विद्यापीठांनी भाग घेतला होता. नवी दिल्ली येथे झालेल्या अंतिम फेरीत न्यायमूर्ती बी. एन. श्रीकृष्ण यांनी प्रमुख परीक्षकाची भूमिका बजावली. त्यांच्यातर्फे ऋत्विक व त्याचे तीन सहकारी यांना बक्षिसे प्रदान करण्यात आली.

**विराज नाडकर्णी जे. ई. ई. (ॲडव्हान्स) मध्ये उत्तीर्ण**

भारतात इंजीनियरींग प्रवेश परीक्षांमध्ये जे. ई. ई. (ॲडव्हान्स) ही स्पर्धा सर्वात अग्रगण्य व आव्हानात्मक. त्यांत केवळ उत्तीर्ण होणे हे सुध्दा कौतुकास्पद. गेल्या पिढीतील जोगेश्वरी येथील एक कर्ते ज्ञातिबांधव कै. बाळकृष्ण (बाळमाम) नाडकर्णी यांचा पणतू कु. विराज विवेक नाडकर्णी हा दादर येथील विद्यालंकार कॉलेजचा विद्यार्थी. यंदाच्या सदर परीक्षेत विराज २५८ क्रमांकाने उत्तीर्ण झाला. आय्. आय्. टी. पवई येथे इलेक्ट्रीकल इंजीनियरींग या शाखेत त्यांने प्रवेश घेतला आहे.

**कृशांग व जयराज बोरकरांचे उज्ज्वल यश**

अंधेरी येथील सौ. अपर्णा व श्री. वामन बोरकर आणि श्रीमती प्रमोदिनी व कै. श्री. रमाकांत मांद्रेकर यांचे दोन नातू चि. कृशांग व चि. जयराज नीलेश बोरकर यांनी विविध स्पर्धेत उज्ज्वल यश मिळविले आहे.

२०१५-१६ ह्या वर्षी इयत्ता ६ वी साठी घेतल्या गेलेल्या डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धापरीक्षेत चि. कृशांगने सुवर्णपदक मिळवले आहे. ही स्पर्धापरीक्षा इयत्ता ६ वी व ९ वी साठी राज्यस्तरावर घेतली जाते. या स्पर्धेत दरवर्षी महाराष्ट्रासह विविध राज्यांतून ५० हजार विद्यार्थी सहभागी होतात. परीक्षा ४ टप्प्यांमध्ये घेतली जाते. प्रथम लेखी नंतर प्रात्यक्षिके त्यानंतर संशोधन प्रकल्प व शेवटी मुलाखत. चि. कृशांग राष्ट्रीय पातळीवर घेतल्या जाणाऱ्या IPM गणित परीक्षेतही गुणवत्ता यादीत उत्तीर्ण झाला आहे.

चि. जयराजने ४ ते ७ वर्षे वयोगटातील असलेल्या कुंग - फू स्पर्धेत सुवर्णपदक पटकावले आहे. ही स्पर्धा शेओलिन असोसिएशन ऑफ ब्लॅक पँथर कमांडोज या संस्थेने आयोजित केली होती.


MSIPL

MANGSIDESH INVESTMENTS PVT LTD

402, Business Point, Paliram Road, Off S.V.Road, Behind Brahma Kumari Hospital, Andheri (West), Mumbai 400 058

Tel No. 022-4233 2323/ 6584 1233/ 6523 8964/ 98337 22444





Can we help you to achieve your goal???

& your goal is....

Let's reach nearer

To your highest GOAL!!!

Step by step....




A little every month grows to something significant over time!!!

Invest Rs.1000/- Per month & get...

| Investment Years | Total Investment | Growth Rate 8% | Growth Rate 12% | Growth Rate 15% |
|---|---|---|---|---|
| 15 | 180,000 | 348,000 | 504,000 | 676,000 |
| 20 | 240,000 | 593,000 | 999,000 | 1,516,000 |
| 23 | 276,000 | 794,000 | 1,473,000 | 2,417,000 |
| 25 | 300,000 | 957,000 | 1,898,000 | 3,284,000 |
| 30 | 360,000 | 1,500,000 | 3,530,000 | 7,010,000 |
| 32 | 384,000 | 1,786,000 | 4,509,000 | 9,473,000 |
| 35 | 420,000 | 2,309,000 | 6,495,000 | 14,860,000 |




Indian Equity market has given avege 16% return s in last 32 year s...

Mutual Fund investments are subject to market risks, read all scheme related documents carefully before investing.

# THANKSGIVING

I, Arun Bhaskar Kasbekar
Who had to undergo a critical
heart bypass surgery on the
14th May and returned home
safe and sound on 26th May,
do hereby love to put on
personal record my sincere
thanks and the appreciation
of my family to all the
visitors, to the hospital and
home, innumerable phone
calls, text messages and
mails from friends and
relatives from all over India
and abroad for their good
wishes and prayers. I also
seek your forgiveness for not
having informed anyone
before the surgery. I am
indeed grateful
particularly to our C.C.I group
for all their assistance
available round the
clock throughout

## स्तुती नाडकर्णी, एक अष्टपैलू विद्यार्थिनी!

हिऱ्याला पैलू असले की, त्याचं तेज झळाळून उठतं. मुलामुलींच्या बाबतीतही तसंच म्हणता येईल. त्यांच्या कर्तृत्वाला अनेक पैलू असले की, त्यांचंही व्यक्तित्व उजळून निघतं! अशा मुलींपैकी एक आहे, 'स्तुती सुयश नाडकर्णी'.

स्तुती ही 'सौ. विपुला व श्री. सुयश नाडकर्णी' यांची कन्या, आणि 'श्री. रत्नाकर व सौ. वंदना पिकळे' यांची नात.

नुकताच एस्. एस्. सी. परीक्षेचा निकाल जाहीर झाला. स्तुती ९६.४ टक्के गुण मिळवून तिच्या 'बालमोहन विद्यामंदिर' या शाळेत दुसरी आली. प्राथमिक व माध्यमिक स्कॉलरशिप परीक्षांमध्ये यशस्वी होऊन तिने शैक्षणिक यशाचा पायाच घातला होता. पण अभ्यासाव्यतिरिक्त अन्य क्षेत्रांमध्येही तिने उज्ज्वल यश मिळविलं आहे.

नृत्याची अतिशय आवड असलेल्या स्तुतीने वयाच्या अवघ्या सहाव्या वर्षी 'राणी वर्मा' यांच्या 'ती' या नृत्यानाट्यात भाग घेतला होता.

इ.स. २००७ पासून ती श्रीमती मनीषा जीत यांच्याकडे कथ्थक नृत्याचे शास्त्रीय शिक्षण घेत आहे. इ.स. २०१३ साली 'क्रिएटिव्ह परफॉर्मिंग आर्टस्' या राज्यस्तरावरील विभागीय स्पर्धेत द्वितीय क्रमांकाचा 'बालश्री' पुरस्कार तिने हस्तगत केला. त्याच वर्षी भारत सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालयातर्फे ठेवण्यात अलेली व कथ्थक नृत्यासाठी असलेली 'कल्चरल् टॅलेन्ट सर्च स्कीम' स्कॉलरशिपही तिने मिळवली. पुण्याच्या अखिल भारतीय सांस्कृतिक संघातर्फे बँकॉक (थायलँड) येथे आयोजित करण्यात आलेल्या 'The Global Harmony 2016 Competition' या स्पर्धेत कथ्थक नृत्यातील 'युगुल' (Duet) या विभागातील 'रौप्य पदक' तिनं जिंकलं. याच संस्थेने २०१५ साली आयोजित केलेल्या राष्ट्रीय स्पर्धेत तिला प्रथम पुरस्कार मिळाला होता. याशिवाय मुंबईच्या स्वर-साधना समितीच्या १२ ते १७ वयोगटाच्या शास्त्रीय नृत्याच्या राष्ट्रीय स्पर्धेत प्रथम पारितोषिक, ब्राह्मण सहाय्यक संघाच्या त्याच वयोगटातील कथ्थक नृत्य स्पर्धेत द्वितीय, तर पं. व्ही. डी. पलुसकर राज्य नृत्य स्पर्धेत ८ ते १२ वयोगटातील तृतीय पारितोषिक मिळालं होतं.

आपल्या नृत्याच्या कार्यक्रमांमधून थोडीफार समाजसेवा करण्याची संधीही स्तुतीला मिळाली, व तिचे तिने सोनं केलं! बान्द्रा व इगतपुरी येथील केंद्रांतील आदिवासी व मागासलेल्या मुलांच्या मदतीसाठी 'Awareness and Appreciation of Classical Dance-Forms' या Aseema (असीमा) या एन्. जी. ओ. नी आयोजित केलेल्या कार्यक्रमात बारा वर्षांच्या स्तुतीने आपल्या नृत्याने सर्वांची वाहवा मिळवली होती. उत्तरांचल येथील

पूरग्रस्तांसाठी 'ममता महाराज' (पं. लच्छूमहाराज यांची कन्या) यांनी बसविलेल्या नृत्यनाट्यातही तिचं योगदान होतं.

याशिवाय भक्तिवेदान्त स्वामी मिशन स्कूल, शिशुवन स्कूल, प्रेमपुरी आश्रम ट्रस्ट यांच्या विद्यमाने आयोजित झालेल्या नृत्यस्पर्धांतूनही स्तुती चमकली आहे.

'अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालयाच्या मध्यमापूर्णा' परीक्षेत तिने विशेष योग्यता मिळवली आहे. नालंदा डान्स रिसर्च सेंटरच्या सहाव्या परीक्षेत ती 'A' श्रेणीत उत्तीर्ण झाली आहे.

गांधी स्मारक समिती, रामकृष्ण मिशन वगैरे संस्थांच्या इंग्रजी, मराठी, संस्कृत पाठान्तर व वक्तृत्व तसेच चित्रकला स्पर्धांतही स्तुतीचा सहभाग होता, बालमोहन विद्यामंदिराचे प्रतिनिधित्व तिने केलं होतं. भगवद्गीता-पाठान्तर स्पर्धेतही ती नेमाने भाग घेत असते. इंटरमिजिएट ड्रॉइंगच्या परीक्षेला बसलेल्या स्तुतीने शाळेतर्फे 'Water is Life' या एस्. आय्.इ.एस्. स्कूलने आयोजित केलेल्या स्पर्धेतही भाग घेतला होता.

कोणतंही क्षेत्र स्तुतीला वर्ज्य नाही. श्रीमती शुभदा दादरकर व श्रीमती मानसी तांबे यांच्याकडून तिने सुगम संगीताचे, तर श्री. चिन्तामणी गोरे यांच्याकडून शास्त्रीय संगीत व हार्मोनियमचं शिक्षण घेतलं आहे. श्री. हेमन्त आरोलकर यांनी तिला बॅडमिन्टनच्या खेळात मार्गदर्शन केलं आहे!

इतक्या लहान वयात अशा अनेक क्षेत्रात रस घेणाऱ्या स्तुतीचं पाऊल नेहमी पुढेच पडत राहो, ही शुभेच्छा!

**सौ. नीलिमा शशिकान्त नाडकर्णी**
**शान्तिनगर, माहीम,**

## विवाह /वाङ्निश्चय

| | | |
|---|---|---|
| तृप्ती उमेश बोरकर, बेंगळूर | व | विभूती सेठी, भुवनेश्वर |
| वरुण शाम (अरुण) बोरकर, दादर | व | श्रेया नितीन कामत, मुंबई |
| नम्रता सुभाष कुलकर्णी, शिर्सी | व | गणेश एस्. पै, सिध्दापूर |
| सुमती गिरीश नाडकर्णी, अमेरिका | व | रॉबर्ट पॅनिशिया, अमेरिका |
| पूजा मंगेश पालेकर, डोंबीवली | व | स्वप्नील प्रकाश गोठीवरेकर, कांदिवली |
| विनता विनायक संजगिरी, दांडेली | व | अनिल पंढरीनाथ पै, दांडेली |

## NKGSB BANK - A CENTURY OF TRUST

Founded by great visionary Sheth Shantaram Mangesh Kulkarni on 26th September 1917, The NKGSB Co-operative Bank Limited, popularly known NKGSB Bank, is one of the leading Multi-State Scheduled Co-operative Banks in the country.

The bank has not only grown in size of deposits and advances, but has multiplied its net worth making it financially sound and fundamentally strong. NKGSB Bank today has a network spread of 105 branches across the four states of Maharashtra, Karnataka, Gujarat and Goa. The Bank further plans to expand its network along with the significant increase in the bottom line. With the Business Mix of more than Rs. 10,500 crores, the Bank nurtures a vision of crossing the milestone of Rs. 25,000 crore Business Mix by March 2022.

As its centenary year approaches, the Bank would like to express its gratitude towards the unflinching Trust which the customers & stakeholders have nurtured over the past 99 years. It is proposed to have a yearlong celebration starting form Sept. 2016 and concluding in Sept. 2017. These various events will be not only held in Mumbai but also at various locations of its branches in Karnataka, Gujarat & Goa, involving its Stakeholders, Customers, well wishers & the Staff. The detailed event calendar will be regularly updated on the Bank's **website. www.nkgsb-bank.com**

### NKGSB CO-OP BANK LTD.

**ANNUAL SHRI SHETH SHANTARAM KULKARNI MEMORIAL LECTURE**

Speaker : Pl. Contact Nearest Branch

Date/Time : Saturday 24th September, 4.30 p.m.

Venue : Pracharya B. N. Sabhagriha
Hindu Colony, Dadar (East)

**ALL ARE CORDIALLY INVITED TO ATTEND THE LECTURE**

## श्री. द. ना. नाडकर्णी यांच्या 'कारवार सत्कारा'चा वृतान्त

आपल्या मुखपत्रिकेचे संपादक श्री. दत्तात्रय नागेश नाडकर्णी ऊर्फ डी.एन्., मुक्काम पारले, यांचे नांव माहीत नाही असे म्हणणारा आपल्या ज्ञातींत अगदीच विरळा, त्यांचे कार्य व महती ज्ञातीपुरती मर्यादित नसून कारवारमधील इतर समाजांतसुध्दा ते ज्ञात आहेत. मॅट्रीकची परीक्षा हिंदू हायस्कूलमधून उतीर्ण झाल्यावर उच्च शिक्षणासाठी व चरितार्थासाठी त्यांनी कारवार सोडून ६० वर्षाहून अधिक काळ लोटला तरी त्यांची कारवारची नाळ तुटली नाही. ते व्यवसायाने सिव्हील इंजीनीअर. एका बहुराष्ट्रीय कंपनीतून उच्च हुद्यावरुन निवृत्त. त्यांचे कारवार येथील हितचिंतक श्री. कृष्णानंद बांदेकर व श्री. प्रीतम मासुरकर या सिव्हील इंजीनीयर मित्रद्वयांना कारवार तालुका सिव्हील इंजीनीयर्स असोसिएशनतर्फे नाडकर्णी यांचा गौरव करावा असे वाटले. २१ मार्च रोजी नाडकर्णी कारवारला वैयक्तिक कामासाठी आले होते ही संधी साधून त्यांनी नाडकर्णी यांचा सत्कार करावयाचे ठरविले.

२१ मार्च ही तारीख योगायोगाची. त्याच तारखेला १९९८ साली मुंबईहून कारवारला जाणाऱ्या पहिल्या आगगाडीतून केवळ हौस म्हणून त्यांनी कारवारचा प्रवास केला होता. दुसऱ्या दिवशी कारवारच्या फलाटावर सर्वप्रथम पाय ठेवण्याचे समाधान त्यांना मिळाले. ते तिकीट व सहप्रवासी गुरुनाथ (पोपट) पिकळे यांच्या सोबत गाडीकडचा फोटो मेमेंटो म्हणून त्यांनी अद्याप आपल्या संग्रहात ठेवले आहे. त्यांच्या उत्कट कारवारप्रेमाची ही एक झलक. असो.

वर नमूद केल्याप्रमाणे २१ मार्च रोजी संध्याकाळी हब्बुवाडा येथील सिव्हील इंजीनीयर्स असोसिएशनच्या सभागृहांत सत्कार समारंभ आयोजित करण्यांत आला. असोसिएशनचे सर्व सभासद व कारवार इतिहासप्रेमी आमंत्रित अशा सुमारे साठेक श्रोत्यांच्या उपस्थितीत कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रीतम मासूरकर हे एके काळचे नाडकर्णी यांच्या ऑफीसमधले सहकारी. त्यांनी नाडकर्णी यांची ओळख करुन देतांना त्यांच्या कार्याची पध्दत, नीटनेटकेपणा, वेळेचा सदुपयोग, निगर्वीपणा, मनमिळाऊ स्वभाव याबद्दल गौरवोद्‌गार काढले. कृष्णानंद बांदेकर यांनी नाडकर्णी यांनी कारवारच्या इतिहाससंदर्भात जो प्रचंड दस्तैवज गोळा केला आहे त्याची तारीफ केली.

रीतसर शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार झाल्यावर नाडकर्णी यांनी आपल्या भाषणास सुरवात केली. विषय होता 'Source Materials Re Historiography of Karwar'. खरे म्हणजे रुढार्थाने ते भाषण नव्हतेच. तो एक कोंकणीतून घरगुती पध्दतीने श्रोत्यांशी संवाद होता. विषय रुक्ष व क्लिष्ट असला तरी त्यांनी तो रंजकपणे हाताळला व अधूनमधून ऐतिहासिक स्वरुपाचे किस्से सांगून श्रोत्यांची करमणूकही केली.

या कार्यक्रमाचे नंतर स्थानिक दैनिकांत नाडकर्णी यांच्या फोटोसह विस्तृत वृत्त छापून

आले. कारवारमध्ये अशा प्रकारचे सांस्कृतिक कार्यक्रम क्वचितच भरविले जातात. आपल्या व्यासंगाचा लाभ नाडकर्णी यांनी कारवारकराना करुन दिला याबद्दल त्यांना धन्यवाद.

**शांताराम (अरुण) कुलकर्णी, कारवार**
०८३८२-२२७०४८, ०९२४२४११५३५

## भारतातील पहिली महिला ॲनिमेटर श्रीमती शैला परळकर अवघे पाऊणशे वयमान

कै विरुपाक्ष वागळे यांची नात, सुशीला उध्दव दिवाडकर यांची कन्या व माझी गुणी बहीण श्रीमती शैला मोहन परळकर हिने नुकतीच वयाची पंचाहत्तरी ओलांडली. त्यानिमित्त तिच्या कर्तृत्वाविषयी दोन शब्द.

शैलानें ॲनिमेशन चित्रपटांसाठी एक नव्हे तर तीन राष्टपती पदके व महाराष्ट्र सरकारचे एक पारितोषिक मिळवले आहे. ती भारतातील पहिली स्त्री ॲनिमेटर असण्याची मानकरी ठरेल. बालपणापासूनच तिला चित्रकलेची आवड. प्रसिध्द चित्रकार श्री. दिनानाथ दलाल व श्री. मुळगांवकर यांची मासिकांवरील मुखपृष्टे पाहून ती त्यांची हुबेहुब नक्कल करत असे. १९५६ मध्ये मॅट्रिक उत्तीर्ण झाल्यावर तिने जे. जे. इन्स्टिटयुट मधून 'अप्लाईड आर्टची' पदवी घेतली. तिला एका ॲड कंपनींत नोकरी मिळाली. तिथेच तिला ॲनिमेशन शिकण्याची संधी मिळाली. त्याकाळात ॲनिमेशन बद्दल फारशी माहिती नव्हती. शिकवणारे शिक्षक नव्हते. ती स्वत:च स्वत:ची शिक्षक बनली. १९६२ मध्ये तिला 'फिल्मस् डिव्हीजनच्या 'कार्टुन फिल्म' युनिटमध्ये नोकरी मिळाली. तेव्हा पासून २००० मध्ये निवृत्त होईपर्यंत तिने वीस एक ॲनिमेशन फिल्मस् बनवल्या. तोपर्यंत कॉम्प्युटर्सचा नुकताच ह्या क्षेत्रात प्रवेश झाला होता. भारतात सर्व चित्रे हातानीच काढून रंगवावी लागत. तिला संपूर्ण फिल्म बनवण्याची संधी मिळाली. स्क्रीप्ट लिहिण्यापासून फिल्म पूर्ण होईपर्यंत सर्व बाजू तिने सांभाळल्या. तिच्या अनेक चित्रपटांना विदेशात खास महोत्सवात प्रदर्शित होण्याचा मान मिळाला.

१९९० मध्ये भारत सरकारतर्फे युनेस्को आयोजीत ॲनिमेशन वरील सेमिनारसाठी तिला झेकोस्लोवाकियात प्रागला पाठविले. तिथे वॉल्ट डिस्ने स्टुडियोच्या दोन प्रतिनिधींची ओळख झाली. त्यांनी त्यांच्या स्टुडियोत ॲनिमेशन डिपार्टमेंटमध्ये काम करण्यासाठी सुचविले. पण काही घरगुती अडचणींमुळे तिने ते नाकारले.

सासरी १५-२० माणसांचं एकत्र कुटुंब. संसार व दोन मुलांना सांभाळून तिने आपले करिअर केले. त्यांत तिचे पती (कै) श्री. मोहन आनंद परळकर यांच्या पाठिंब्याची जोड होती. वेळ मिळेल तेव्हा विणकाम, भरतकामही करत. तसे अजूनही करते. पेंटींगपण करते. एवढे भरघोस यश मिळूनसुध्दा तिचे पाय जमिनीवरच आहेत. अशा व्यक्ती दुर्मिळच. तिचे उर्वरित आयुष्य आरोग्यदायी व सुखाचे जावे हीच इच्छा. जीवेत् शरद: शतम् !

**श्रीमती जयश्री कृ. तेलंग (नाशिक)**

## CENTENERY YEAR OF LATE GOPALKRISHNA DIVEKAR

### MY FATHER - MY IDEAL - A TRIBUTE

Gopalkrishna Divekar was born exactly 100 years ago to Dewan of Mudhol, Rao Bahadur Raghavendra and Mrs Lakshmi Divekar on 02 June 1916 at Kajubagh, Karwar. Life threw him many daunting challenges. At a tender age of 16 he became head of the family when his father died and left him to complete the house which was incomplete the house and take care of his mother and siblings. His service in Customs and Central Excise took him to remote locations all over India such as Castle Rock, Jaysingpur, Simla, Madras, Bellary, Baroda etc. He accepted these stoically and with a smile and never as an excuse or reason to avoid duty. May be it was GOD's way to test his mettle, to make him stronger and better. He came out tops - a winner which is a tribute to his resilience and character.

He did his BA and MA from Wilson College where he was also the Champion sportsman captaining the college Teams in Tennis, Table Tennis, Badminton and Football. At the age of 40 he won the Bronze in All India Customs and Central Excise Athletics defeating younger competitors. At 58 he got his LLB. Pursuit of knowledge to serve society was his dharma and he did this karma till his very last day.

He was an enlightened person who believed in women empowerment. He encouraged my mother to play badminton and drive a car in the early 60s much to the amazement of many. My sisters were allowed to cycle all the way to college far away from home. A very helpful person he endeared himself to all. His sisters, nieces looked up to him for advice and help and he always had time for them. He rose to be a Deputy Collector in Customs and Central Excise and is still revered as an honest, simple, humble and loyal superior and friend. Dogs were his love amongst many others and at one time we had 4 at home. Supremely fit he used to climb three floors everyday even when he was 86 years old.

He lived for others and he touched so many lives. He made a difference to those he came in contact with. We now live through him. Many who knew him, see him in me, in my actions and deeds. I feel blessed. He was an ideal father and I miss his support, care, love, advice and blessings even today.

On his 100th year of birth, this is my tribute to a legend -

GOPALKRISHNA RAGHAVENDRA DIVEKAR

**(Sponsored)** **Brig. Rajiv Divekar (Retd), Pune**

# विवाहाचा सुवर्ण महोत्सव ४ जून २०१६
# शरद काशिनाथ वागळे व उषा विठोबा कामत



४ जून १९६६
विवाहदिन



४ जून १९९१
रौप्य महोत्सव दिन




४ जून २०१६
सुवर्ण महोत्सव दिन

राघववाडी, फ्रेंच ब्रीज, येथे राहणारे कै काशिनाथ व कै मंजुळा (मंजुळमावशी) वागळे यांचे सुपुत्र शरद व सूनबाई उषा यांच्या वैवाहिक जीवनाला ४ जून रोजी ५० वर्षे पूर्ण झाली. त्याप्रसंगी त्यांच्या भावंडाच्या कुटुंबीयांनी मुंबई येथे सुवर्णमहोत्सव साजरा केला. अमेरिकेतील त्यांच्या दोन्ही मुलांच्या कुटुंबीयासमवेत हा आनंद साजरा करण्यासाठी ते सध्या अमेरिकेत गेले आहेत.

## संघाचे एक आधारस्तंभ श्री. देवीदास कसबेकर यांचे शोचनीय निधन

२५ मे २०१६ च्या दुपारी फोनवरुन श्री. देवीदास देवराव कसबेकर यांच्या मृत्यूची बातमी धडकली. मन सुन्न होऊन २५ वर्षे मागे गेले. संघाच्या कार्यालयात नोकरीसाठी ते इतरांबरोबर माझी मुलाखत घेत होते. त्याच दिवशी माझ्या हातात तिजोरीच्या चाव्या सुपूर्द करण्यात आल्या. त्यानंतर हळूहळू श्री. कसबेकरांचा परिचय वाढत गेला.

१९८२ सालापासून ते संघाच्या कार्यकारिणीचे सभासद होते. अत्यंत क्रियाशील, कष्टाळू, सदैव विचारपूर्वक व पध्दतशीरपणे काम करणे हे त्यांचे वैशिष्ट्य. सुबक वळणदार अक्षर ही तर त्यांची खासियत. संघाची कालबाहय नियमावली व घटना दुरुस्तीचे जबाबदारीचे व मेहनतीचे काम त्यांनी श्री. डी. एन. नाडकर्णी यांच्या बरोबर चिकाटीने एका वर्षात पूर्ण केले.

ऑक्टोबर १९९३ साली नोकरीतून निवृत्त झाल्यावर ते पुण्याला स्थायिक झाले. त्यामुळे त्यांना नाईलाजाने कार्यकारिणीचा राजीनामा द्यावा लागला. तरीही कार्यकारिणीच्या सभेत विचारविनिमय करायचा असेल तर ते तेवढयासाठी इतर महत्वाची कामे बाजूला सारुन पुण्याहून येत. १९९९ साली संघाने त्यांना सन्माननीय सभासदत्व बहाल केले. गरीबांविषयींचा कळवळा त्यांच्या दरवर्षीच्या देणग्यावरुन प्रत्ययास येत असे. पुण्यातील अनाथाश्रमास सुध्दा ते मुक्तपणे देणग्या प्रदान करीत.

रिझर्व्ह बँकेची स्थापना व आपल्या संघाची स्थापना एकाच वर्षी म्हणजे १९३५ साली. कसबेकर यांचा जन्मही त्याच वर्षी. योगायोग म्हणजे त्यांनी दोन्हीही ठिकाणी जबाबदारीची कामे केली होती.

**ईश्वर त्यांच्या आत्म्यास सद्गती देवो!**

**मृदुला भांडारकर, गिरगांव**


**SHREE HOMOEOPATHIC PHARMACY**

**Wholesale & Retail For :**
**Genuine Indian & Imported Homoeopathic Medicines**

Laxmi Ratan Co-op. Hsg., Shop No. 6, Opp. Karnataka Sangh Hall, Mogal Lane, Matunga (West), Mumbai - 400 016. Tel. : 2438 3092 / 2430 9035 Mob. : 98694 83433
Time : 9.00 a.m. to 8.00 p.m. **(SUNDAY CLOSED)**

**Mrs. Nandita D. Wagle, Dr. Divya D. Wagle (BHMS. Bom.), Dr. Dilip M. Wagle (LCEH. Bom.)**

# आपल्यासाठी भक्तीचा एक स्वर्णिम अनुभव !





## श्रीमंगेश, श्रीशांतादुर्गा, श्रीमहालक्ष्मी, श्रीमहालसा आणि श्रीनागेश

**यांच्या फायबरच्या मूर्ती टिकाऊ सोन्याच्या प्लेटिंगसह उपलब्ध**

वास्तुशास्त्राप्रमाणे घडविलेली 'तोरणलक्ष्मी'
तसेच गणेश, लक्ष्मी, सरस्वती आणि कुबेर यांच्या
मूर्तीसुध्दा उपलब्ध आहेत.

संपर्कः
चंद्रशेखर सुनील खांडाळेकर, जे/६ शारदाश्रम, भवानीशंकर मार्ग, दादर, मुंबई-४०० ०२८
फोन - ९८१९५ २३५५१ / ९८६७३ ५१६७३
facebook page-Holygold

## निधन

| | | |
|---|---|---|
| प्रताप (अवधूत) भवानीशंकर बोरकर | (कडवाड) | वांद्रे |
| किशोरी यशवंत (मधु) बोरकर | (कोडीबाग) | अंधेरी |
| सुधा शेषगिरी देसाई | (व्हंडक्कल) | माहीम |
| चंद्रशेखर (विजय) नीलकंठ धुमे | (बाड) | माहीम |
| विजय मंगेश कंटक | (अंकोला) | वरळी |
| मारुती यशवंत कंटक | (अंकोला) | औरंगाबाद |
| घनश्याम कृष्णराव करुर | (शिरसी) | वांद्रे |
| देवीदास देवराव कसबेकर | (खारगे) | पुणे |
| नीला दिगंबर कसबेकर | (कडवाड) | अंधेरी |
| विठ्ठल यशवंत कसबेकर | (कडवाड) | शिकागो |
| शंकर (जयवंत) रामकृष्ण कुलकर्णी | (हळगे) | गिरगांव |
| उषा प्रभाकर कुलकर्णी | (हळगे) | गोरेगांव |
| गीता माधव मंत्री | | |
| (पूर्वाश्रमीच्या शैला मोहन नाडकर्णी) | (सांवरपै) | जोगेश्वरी |
| गीता किरण नाडकर्णी | (सांवरपै) | कारवार |
| सुमित्रा जयवंत नाडकर्णी | (अंकोला) | माहीम |
| विमल जयंत नाडकर्णी | (अगळी) | पुणे |
| वसंत नागेश सलगर | (सदाशिवगड) | बंगळूर |
| लक्ष्मीबाई माणिक संजगिरी | (गांवगेरी) | दांडेली |
| शंकर रघुनाथ तेलंग | (हारवाडा) | बंगळूर |
| अहिल्या केशवराव तेलंग | (बाड) | लक्ष्मेश्वर |
| विजय महारुद्र वाघ | (सदाशिवगड) | डेट्रॉईट |
| मंगेश गोविंद वाघ | (सदाशिवगड) | माहीम |
| जगदीश दिगंबर वाघ | (सदाशिवगड) | जोगेश्वरी |
| कमल सदानंद वागळे | (बाड) | ठाणे |
| मंदाकिनी यशवंत (बाबू) वागळे | (बाड) | जोगेश्वरी |
| मोहन विष्णु वागळे | (माजाळी) | माहीम |
| सुधा (इंदिरा) लक्ष्मीकांत (दिनू) वागळे | (माजाळी) | जोगेश्वरी |
| शशिकांत काशिनाथ वागळे | (माजाळी) | नाशिक |

*** किशोरी कैसरे बोरकर यांनी देहदान केले आहे.**

## कवळेंमठ संस्कृत पाठांतर स्पर्धा

कैवल्यपूर मठाधीशांच्या आशीर्वादाने यंदाही संघाच्या विद्यमाने संस्कृत पाठांतर स्पर्धा आयोजिण्यात येत आहे. नेहमीप्रमाणे यंदाही स्पर्धकांसाठी दोन गट पाडलेले आहेत. पण शिशु गटातील कुठल्याही स्पर्धकास कुमार गटातही भाग घेण्यास मुभा आहे. प्रत्येक गटासाठी तीन पारितोषिके आहेत. पूर्व तयारी करण्यासाठी स्पर्धकांनी लवकरात लवकर पण ७ सप्टेंबर २०१६ पर्यंत आपली नावे पत्राने अथवा फोनवर (२३८७७३०१) श्रीमती भांडारकर यांच्याकडे नोंदवावी व थेट स्पर्धेच्या ठिकाणी हजर राहावे.

**स्पर्धेची वेळ :** रविवार १८ सप्टेंबर २०१६

**स्पर्धेचे स्थळ :** तेंडुलकर मंगल कार्यालय, मोगल लेन, माहीम

### शिशु गट : इयत्ता ४ थी पर्यंत

**पर्याय क्र. १ : अलसस्य कुतो विद्या अविद्यस्य कुतो धनम्।**
**अधनस्य कुतो मित्रं अमित्रस्य कुतो सुखम्।।**
**उद्यमं साहसं धैर्यं बुध्दिः शक्तिः पराक्रमः।**
**षडेते यत्र वर्तन्ते तत्र देवः सहायकृत्।।**
**उद्यमेन हि सिध्यन्ति कार्याणि न मनोरथैः।**
**नहि सुप्तस्य सिंहस्य प्रविशन्ति मुखे मृगाः।।**
**आलस्यं हि मनुष्याणां शरीरस्थो महारिपुः।**
**नास्ति उद्यमसमो बन्धुः कृत्वा यं नाव सीदति।।**

**पर्याय क्र. २ : काकः कृष्णः पिकः कृष्णः को भेदः पिककाकयोः।**
**वसंतसमये प्राप्ते काकः काकः पिकः पिकः।।**
**कोकिलानां स्वरोरूपं नारीरूपं पतिव्रतम्।**
**विद्या रूपं कुरूपाणां क्षमा रूपं तपस्विनाम्।।**
**उदारस्य तृणं वित्तं शूरस्य मरणं तृणम्।**
**विरक्तस्य तृणं भार्या निःस्पृहस्य तृणं जगत्।।**
**उपदेशो हि मूर्खाणां प्रकोपाय न शान्तये।**
**पयः पानं भुजङ्गानां केवलं विषवर्धनम्।।**

## शिशु गट : इयत्ता ५ वी ते १० वी पर्यंत

पर्याय क्र. १ : सत्यं वद। धर्मं चर। स्वाध्यायान्मा प्रमद।
सत्यात् न प्रमदितव्यम्। धर्मात् न प्रमदितव्यम्।
मातृ देवो भव। पितृ देवो भव।
आचार्य देवो भव। आतिथि देवो भव।
श्रध्दया देयम्। अश्रध्दया अदेयम्।
श्रिया देयम्। ह्रिया देयम्।
भिया देयम्। संविदा देयम्।
एष आदेशः। एष उपदेशः।
एषः वेदोपनिषत्। एतद् अनुशासनम्।
ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः।

पर्याय क्र. २ : केयूरा न विभूषयन्ति पुरुषं हारा न चंद्रोज्ज्वला।
न स्नानं न विलेपनं न कुसुमं नालंकृता मूर्धजाः।।
वाण्येका समलङ्करोति पुरुषं या संस्कृता धार्यते।
क्षीयन्ते खलु भूषणानि सततं वाग्भूषणं भूषणम्।।
विद्या नाम नरस्य रूपमधिकं प्रच्छन्न गुप्तं धनम्।
विद्या भोगकरी यशः सुखकरी विद्या गुरूणां गुरूः।।
विद्या बन्धुजनो विदेशगमने विद्या परं दैवतम्।
विद्या राजसु पूज्यते न हि धनं विद्याविहीनः पशुः।।

संकलन : विद्या वागळे, माहीम,

**श्रध्दांजली**

**कै. सावित्रीबाई (कावेरी) नागेश नाडकर्णी (सांवरपै)**

३१ वे पुण्यस्मरण, निधन : रविवार २८ जुलै १९८५

तुझ्या प्रेमळ आठवणीशिवाय गेल्या ३१ वर्षात एकही दिवस गेला नाही. श्रीमंगेश तुझ्या आत्म्यास शांती देवो. तुझा आशीर्वाद आमच्या पाठीशी अखंड राहो. तुझ्या स्मृतीस सादर प्रणाम.

**विनय (मोरेश्वर) नागेश नाडकर्णी, पुणे**


www.kccgoa.in




अप्रतिम निसर्गाने नटलेलं **सुखसमृद्धी**

**मंगेशाच्या देवळापासून २ मिनिटांच्या अंतरावर,**
**मंगेशी, फोंडा- गोवा**

प्रॉजेक्ट मान्यता: गोवा टाउन प्लॅनिंग
कर्जसहाय्य: नामवंत वित्त संस्था



मनाला भुरळ घालणारं गोव्याचं आल्हाददायक सृष्टीसौंदर्य, प्रदूषणविरहीत हवा, खळाळणारं पाणी आणि सोबत मंगेश, म्हाळसा, नृसिंह, नवदुर्गा अशा देव-देवतांच्या सान्निध्याने पवित्र झालेला परिसर याने नटलेला आमचा नवा प्रकल्प 'सुखसमृद्धी' म्हणजे नावाला साजेसं असं सुख, समृद्धी आणि मांगल्याचं वरदान ठरेल हे नक्कीच. निसर्गाच्या सान्निध्यात राहून मनःशांति मिळविण्यासाठी आजच आमच्याशी संपर्क साधा.

**फ्लॅटस् उपलब्ध: १ रुम किचन, १ बी.एच्.के, २ बी.एच्.के**

a Project by:
**कुणाल कन्स्ट्रक्शन कंपनी**

**मुंबई ऑफिस:** श्री. उमेश केरकर, 401, चौथा मजला, व्योम आर्केड, युनायटेड इंक कंपनीच्या बाजूला, सुभाष रोड, विलेपार्ले (पू), मुंबई- 400057. टलि:**2683 3841/47/ 72.** मोबा: **98336 36451**
फॅक्स: 2683 3872 ई-मेल: kunalconstruction@vsnl.net, kunalconstructiongoa@yahoo.in

गोवा ऑफिस: टी- १, रॉयल हाऊस, काझीवाडो, फोंडा- गोवा. मोबा: 98209 33352, 98206 33321

गोवा साईट: 95/1, वेलिंग, मंगेशी, म्हार्दोळ, फोंडा- गोवा

saadadvertising.com

## संघास व एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या देणग्या

(मागील अंकानंतर)

### उल्लेखनीय देणग्या

### कै. वाय. आर. दिवेकर यांच्या १२५ व्या जयंतीप्रसंगी संघाला सव्वा सहा लाख रुपयांची देणगी

समानतेचे निस्सीम उपासक, जन्मजात खिलाडू वृत्तीचे, निसर्गवेडे, कुठलेही काम गौण न समजणारे, कुशाग्र बुध्दीचे कै. यशवंत रुद्रप्पा दिवेकर यांचा जन्म ५ मे १८९१ रोजी कणसगिरी येथे झाला. यंदा ५ मे २०१६ रोजी त्यांची १२५ वी जयंती. या प्रसंगी त्यांचे सुपुत्र श्री शरत् दिवेकर यांनी संघाला सव्वा सहा लाख रुपयांची देणगी दिली आहे. ५ मे १९९१ रोजी कै. दिवेकर यांच्या जन्मशताब्दीप्रसंगी त्यांच्या कुटुबीयांनी आपल्या एज्युकेशन सोसायटीला सव्वा लाख रुपयांची देणगी दिली होती.

कै. दिवेकर मॅट्रीक परीक्षेंत तेव्हांच्या मुंबई इलाख्यात गुणवत्ता यादींतून दुसऱ्या क्रमांकाने उत्तीर्ण झाले होते. संस्कृतमधील प्रावीण्याबद्दल त्यांना एल्फिन्स्टन कॉलेजमध्ये शिकतांना दक्षिणा फेलोशिप मिळाली होती. त्यानंतर जंगल खात्यांत निवड झाल्यावर त्यांनी डेहराडून येथे प्रशिक्षण घेतले. इंग्रजांच्या हाताखाली काम करतांनासुध्दा ते निर्भीडपणे वागत. स्वकर्तृत्वाने कॉँझर्व्हेटर ऑफ फोरेस्ट या अत्युच्य पदावर पोचून १९४६ साली ते निवृत्त झाले. सहावे जॉर्ज यांच्या राज्यारोहणप्रसंगी २० जुलै १९३७ रोजी सरकारतर्फे त्यांना खास पदक देऊन गौरविण्यांत आले होते. त्यांच्या कामाच्या फाईल्सचा आदर्श म्हणून इतर अधिकारी उपयोग करीत असत.

अशा या कर्तबगार व्यक्तीचे १२डिसेंबर १९७५ रोजी दु:खद निधन झाले.

### श्री. विठ्ठल (बाळ) पालेकर यांजकडून संघाला आणखी पाच लाख रुपयांची देणगी

शतकवीर श्रीमती इंदु मुझुमदार यांचा अलीकडे १३ मे रोजी संघ व एज्युकेशन सोसायटीतर्फे त्यांच्या निवासस्थानी जाऊन सत्कार करण्यांत आला त्याचे वृत्त याच अंकांत इतरत्र छापून आले आहे. त्याप्रसंगी इंदुकाकींच्या कन्या सौ. लता व संघाला वेळोवेळी भरघोस देणारे त्यांचे जामात श्री विठ्ठल (बाळ) शिवानंद पालेकर हेही उपस्थित होते. त्यावेळी इतर गप्पागोष्टी करण्याच्या ओघांत संघ करीत असलेल्या ज्ञातिबांधवांच्या सेवेची श्री. पालेकर यांना पुरेपूर जाणीव झाली व नंतर लगेच त्यांनी कार्यकारिणीकडून होत असलेल्या सत्कार्याचे कौतुक म्हणून संघाला पाच लाख रुपयांची देणगी दिली. अशा प्रकारच्या प्रोत्साहनाने कार्यकर्त्यांनाही हुरुप येतो.

### श्री. भालचंद्र देसाई यांजकडून वृध्दसेवानिधीसाठी दोन लाख रुपयांची देणगी

मूळचे व्हंडक्कलचे, अंधेरी येथे राहणारे श्री. भालचंद्र दिनकर देसाई यांच्या पत्नी

श्रीमती अनुराधा यांचे २०१४ साली दु:खद निधन झाले. श्री. देसाई यांनी पत्नीच्या स्मृतीप्रीत्यर्थ वृध्द सेवा निधीसाठी दोन लाख रुपयांची देणगी दिली आहे.

## श्री शरद पिकळे यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ वैद्यकीय साहाय्याप्रीत्यर्थ दीड लाख रुपयांची देणगी

प्रशांत सोसायटी, माहीम, येथे राहणारे कै शरद रामराव पिकळे हे आपल्या ज्ञातीचे एक हितचिंतक होते. त्यांच्यातर्फे संघाला व एज्युकेशन सोसायटीला वेळोवेळी उल्लेखनीय देणग्या मिळाल्या आहेत. त्यांचे सप्टेंबर २०१५ रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ त्यांच्या कन्या सौ.प्रतिमा, जामात श्री. पांडुरंग सदानंद देसाई व नात कु. प्राची यांच्याकडून वैद्यकीय साहाय्याप्रीत्यर्थ संघाला दीड लाख रुपयांची देणगी मिळालेली आहे.

## श्री विश्वेश (बाळ) फेणे यांच्या जन्मशताब्दी प्रसंगी वृध्दसेवानिधीसाठी एक लाख रुपयांची देणगी

श्री. विश्वेश (बाळ) नरहर फेणे हे कापड निर्मिती उद्योगांतील एक अधिकारी व्यक्ती म्हणून ख्यातनाम होते. ते संघाचे हितेच्छुही होते. त्यांच्या एका मुलाचे अल्पवयी निधन झाले होते. त्याच्या स्मृतीप्रीत्यर्थ ते संघाला सतत देणग्या देत असत, सप्टेंबर २००६ साली त्यांचे निधन झाले. १५ जून २०१६ हा त्यांचा जन्मशताब्दी दिन. त्या प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ त्यांच्या कन्या सौ. अलका अतुल वर्टी यांनी संघाच्या वृध्दसेवानिधीसाठी एक लाख रुपयांची देणगी दिली आहे.

## श्रीमती इंदिरा देसाई यांच्या जन्मशताब्दीप्रसंगी वैद्यकीय साहाय्याप्रीत्यर्थ एक लाख रुपयांची देणगी

पूर्वी पारले येथे राहणारे श्री. वासुदेव (मोहन) वैकुंठ देसाई यांच्या जन्मशताब्दी प्रसंगी २०१० साली त्यांचे पुत्र श्री. दिलीप व कुटुंबीय यांच्यातर्फे संघाला एक लाख पस्तीस हजार रुपयांची देणगी मिळाली होती. दरम्यान दिलीप यांचे अलीकडेच फेब्रुवारी महिन्यांत निधन झाले. त्यांच्या मातोश्री श्रीमती इंदिरा देसाई यांचा २९ एप्रिल २०१६ हा जन्मशताब्दी दिन. याप्रसंगी त्यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ दिलीप यांच्याच इच्छेनुसार संघाच्या वृध्द सेवानिधीसाठी एक लाख रुपयांची देणगी मिळाली आहे.

## श्री. भालचंद्र व श्रीमती माधवी दुभाषी यांच्या विवाहाच्या सुवर्णवर्षप्रसंगी संघाला पन्नास हजार रुपयांची देणगी

प्रकांड पंडित वामन मंगेश दुभाषी ऊर्फ ऋग्वेदी यांचे नातू श्री. भालचंद्र महारुद्र दुभाषी व त्यांच्या पत्नी माधवी (विजया) हे दोघेही हयात नाहीत. १ मे हा त्यांच्या विवाहाचा सुवर्ण वर्ष दिन. या प्रसंगी उभयतांच्या स्मृतीप्रीत्यर्थ त्यांचे पुत्र श्री. वामन (किरण), स्नुषा डॉ. श्रीमती अपर्णा व नातू कु विश्वेश यांच्यातर्फे समाजसेवा निधीसाठी पन्नास हजार रुपयांची देणगी मिळाली आहे.

## संघास मिळालेल्या देणग्या

| | | |
|---|---|---|
| १. | श्रीमती कमला गणपत पालेकर यांच्या स्मरणार्थ पुत्र डॉ. महाबळेश्वर पालेकर व कन्या श्रीमती रेणुका देसाई व श्रीमती सुरेखा देसाई यांजकडून | १५,००० |
| २. | श्रीमती इंदिरा रामचंद्र कामत (विठाबाई कसबेकर)यांच्या स्मरणार्थ | |
| | कन्या श्रीमती शिल्पा व जामात श्री सुधीर मनोहर वर्दे यांजकडून | २,५०० |
| | पुत्र श्री. दिलीप व स्नुषा श्रीमती उमा यांजकडून | २,५०० |
| ३. | श्रीमती शांताबाई (चंपूताई) रमाकांत बोरकर यांच्या ७ व्या पुण्यतिथी निमित्त त्याच्या मुलांकडून | १,००१ |
| ४. | श्रीमती कमल विश्वनाथ फेणे यांच्या १० व्या पुण्यतिथीनिमित्त पती श्री. विश्वनाथ गोविंद फेणे यांजकडून | १०,००० |
| ५. | प. पू. कैवल्यपूर मठाधिपती श्री. शिवानंद सरस्वती स्वामी महाराज यांजकडून संस्कृत पाठांतर स्पर्धेसाठी | ५,००० |
| ६. | श्री. सच्चिदानंद नागेश नाडकर्णी यांच्या २० व्या पुण्यतिथी निमित्त नाती सुदिप्ता व अनुष्का सुबोध नाडकर्णी यांजकडून | ५,००० |
| ७. | श्रीमती नीना (सुमन) दिगंबर कसबेकर यांच्या १५ व्या पुण्यतिथी निमित्त पती श्री. दिगंबर मारुती कसबेकर व कन्या श्रीमती संध्या व सुजाता यांजकडून | १,००१ |
| ८. | श्रीमती मीरा (सुशीला) चंद्रकांत नाडकर्णी यांच्या ८ व्या पुण्यतिथीनिमित्त पुत्र श्री. अतुल व स्नुषा श्रीमती अंजली यांजकडून | २,००१ |
| ९. | श्रीमती माधवी व श्री भालचंद्र महारुद्र दुभाषी यांच्या विवाहाच्या सुवर्ण महोत्सवी वर्ष प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ पुत्र श्री. वामन (किरण), स्नुषा डॉ. श्रीमती अपर्णा व नातू कुमार विश्वेश यांजकडून | ५०,००० |
| १०. | श्री काशिनाथ त्रिंबक नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ कुटुंबीयांकडून | १,००१ |
| ११. | श्री. सदानंद कृष्णा देसाई यांजकडून | १२,००० |
| १२. | श्रीमती लक्ष्मीबाई माणिक संजगिरी यांच्या रामनवमीच्या निर्वाण दिनाच्या प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ पुत्र सर्वश्री अनंत, महेश, व विनायक यांजकडून | ११,१११ |
| १३. | श्रीमती लता व श्री विठ्ठल (बाळ) शिवानंद पालेकर यांजकडून संघ कार्यकारिणीच्या सभासदांच्या सत्कार्याची प्रशंसा म्हणून | ५,००,००० |
| १४. | डॉ. गजानन शिवराव नाडकर्णी व श्रीमती शीला नागेश (परेश) बर्डे यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त हितचिंतकाकडून शुभेच्छापूर्वक | ५,००० |

१५. श्री. गोपाळकृष्ण राघवेंद्र दिवेकर यांच्या जन्मशताब्दी प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ पुत्र ब्रिगेडियर राजीव व स्नुषा श्रीमती लक्ष्मी (स्मिता) यांजकडून — २५,०००

१६. सौ. उषा व श्री. निशिकांत लजपत नाडकर्णी यांजकडून विवाहाच्या सुवर्णजयंतीप्रसंगी — १०,०००

१७. कुटुंबप्रमुख श्रीमती इंदिराबाई लजपत नाडकर्णी यांच्या जन्मशताब्दी प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ

पुत्र श्री. निशिकांत व स्नुषा उषा यांजकडून — ५,०००

नात कु. वैशाली नि. नाडकर्णी यांजकडून — ५,०००

## वृध्दसेवा निधीसाठी

१. श्री शिवानंद बाळकृष्ण पालेकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त पुत्र श्री. विठ्ठल (बाळ) व स्नुषा श्रीमती लता यांजकडून — १०,०००

२. श्रीमती अनुराधा भालचंद्र देसाई यांच्या स्मरणार्थ पती श्री. भालचंद्र दिनकर देसाई यांजकडून — २,००,०००

३. श्रीमती इंदिरा वासुदेव देसाई यांच्या जन्मशताब्दी निमित्त (२९.४.२०१६) कन्या श्रीमती ज्योती माधव मुझुमदार यांजकडून — १०,०००

४. श्री यशवंत रुद्रा दिवेकर यांच्या १२५ व्या वाढदिवसाच्या प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ पुत्र श्री शरत यांजकडून — ६,२५,०००

५. श्री. नीळकंठ मंगेशराव देसाई यांच्या जन्मशताब्दीनिमित्त नातू श्री. अमेय रोहिदास नायक यांजकडून — ४५,०००

६. श्री. विश्वेश (बाळा) नरहर फेणे यांच्या जन्मशताब्दी निमित्त यांच्या स्मरणार्थ कन्या श्रीमती अलका अतुल वर्टी यांजकडून — १,००,०००

७. श्रीमती विनता विश्वंभर गायतोंडे यांच्या १५ व्या पुण्यतिथीनिमित्त बंधू श्री. अरुणकुमार विश्वंभर गायतोंडे यांजकडून — १०,०००

८. श्रीमती उमाबाई विश्वंभर गायतोंडे यांच्या २९ व्या पुण्यतिथीनिमित्त पुत्र श्री अरुणकुमार यांजकडून — १०,०००

९. श्री. मधुकर वेंकटराव नाडकर्णी यांच्या वाढदिवसाच्या प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती माधुरी कन्या कु. शीतल व शिल्पा मधुकर नाडकर्णी यांजकडून — २,००१

१०. श्री. कमलाकर महेश्वर मुझुमदार यांच्या १०० व्या वाढदिवसाच्या प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ पुत्र श्री रवींद्र, स्नुषा श्रीमती उषा व नातू श्री. अमेय यांजकडून — ५,००१

११. श्री विजय मंगेश कंटक यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ बहिणींकडून — १०,०००

## वैद्यकीय साहाय्याप्रीत्यर्थ

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. गोविंद मारुति कसबेकर यांच्या ५ व्या पुण्यतिथीनिमित्त पुत्र श्री. विनय यांजकडून | ३,००० |
| २. | श्रीमती इंदिरा वासुदेव देसाई यांच्या जन्मशताब्दीनिमित्त (२९.४.१६) पुत्र कै. दिलीप वासुदेव देसाई यांच्या इच्छेनुसार | १,००,००० |
| ३. | श्री. शरद रामराव पिकळे यांच्या स्मरणार्थ कन्या श्रीमती प्रतिमा, जामात श्री. पांडुरंग सदानंद देसाई व नात कुमारी प्राची देसाई यांजकडून | १,५०,००० |

## एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या देणग्या

| | | |
|---|---|---|
| १. | श्रीमती शांताबाई (चंपूताई) रमाकांत बोरकर यांच्या ७ व्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या मुलांकडून | १,००१ |
| २. | श्री. बाळकृष्ण शिवकुमार नाडकर्णी यांजकडून | २५,००० |
| ३. | श्रीमती ललिता माधव वागळे यांच्या १९ व्या पुण्यतिथीनिमित्त बंधू श्री. अरुणकुमार विश्वंभर गायतोंडे यांजकडून | १०,००० |
| ४. | अत्यंत प्रिय मित्र श्री. अरविंद द्वारकानाथ देशपांडे यांच्या प्रथम पुण्यतिथीनिमित्त श्री. मारुति सुब्राव दिवेकर यांजकडून | ५,००० |
| ५. | श्री. मोहन मंगेश वाघ यांच्या वाढदिवसाच्या प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती मेहरु व कन्या कुमारी मनीषा मोहन वाघ यांजकडून | ११,००१ |
| ६. | श्रीमती अश्विनी रायबागी व नातेवाईक (अमेरिका) यांजकडून | ३१,४३४ |
| ७. | श्री सुबोध मंगेश मुळगांवकर यांच्या ३ ऱ्या पुण्यतिथीनिमित्त पत्नी श्रीमती सुषमा यांजकडून | २५,००० |
| ८. | श्रीमती सुनीता सुरेश शहापूरकर यांच्या दुसऱ्या पुण्यतिथीनिमित्त बंधू श्री. अरुणकुमार विश्वंभर गायतोंडे यांजकडून | १०,००० |
| ९. | दिवंगत नातेवाईक व मित्र यांच्या स्मरणार्थ श्री. जगदीश पांडुरंग वाघ यांजकडून | १०,००० |
| १०. | श्री. श्रीपाद फोंडबा वागळे यांच्या जन्मशताब्दीप्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ पुत्र श्री. प्रथमेश यांजकडून | २५,००० |
| ११. | श्रीमती कमल विश्वंभर गायतोंडे यांच्या १० पुण्यतिथीनिमित्त बंधू श्री. अरुणकुमार वि. गायतोंडे यांजकडून | १०,००० |

Regd. with registrar of Newspapers of India under Reg. No. RN37436/80




A bank that understands the
true meaning of TRUST.
Because our success has been based on
the bonds we've created through the years.

Foundation Day: **26 Sept.**
**98 Years of Trust.**

**NKGSB Bank**
***NKGSB Co-op. Bank Ltd.***

**Customer Care No.: 022- 2860 2000 | Web: www.nkgsb-bank.com**

SAADCOMMUNICATIONS

हे पत्र संपादक, मुद्रक, प्रकाशक द. ना. नाडकर्णी यांनी
दि नॉ. कॅ. गौ. सा. ब्रा. संघ, मुंबई ४, यांच्यासाठी प्रसिद्ध केले.